## संक्षिप्त

### क्रिकेट सट्टा अड्ड्यावर छापा

**नागपूर :** हुडकेश्वर पोलीस हद्दीतील शिवाजी कॉलनी येथील एका घरात सुरू असलेला क्रिकेट सट्ट्याचा अड्डा पोलिसांनी मंगळवारी उधळून लावला. या घरातून संघर्ष पाटील हा तरुण रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायगर्सदम्यान खेळल्या गेलेल्या आयपीएल क्रिकेट सामन्यावर भ्रमणध्वनीवर आकडे घेत होता. हुडकेश्वर पोलिसांच्या पथकाने घरावर छापा टाकत पाटील याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे सापडलेले चारही भ्रमणध्वनी संच पोलिसांनी ताब्यात घेतले.

### दुचाकीच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यू

**नागपूर :** शेतातले काम आटोपून सायकलने घराकडे सायकलने निघालेल्या ज्येष्ठ नागरिकाचा दुचाकीने पाठीमागून धडक दिल्याने मृत्यू झाला. हिंगणा पोलीस हद्दीतील संकल्प व्यसनमुक्ती केंद्राजवळ बुधवारी हा प्राणांतिक अपघात घडला. अपघातानंतर दुचाकीस्वार घटनास्थळावरून पसार झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाबाराव आनंदराव भगत (६५, रा. मोंढा, ता. हिंगणा) हे सायकलने मोंढा गावाकडून हिंगणाकडे जात होते. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास संकल्प व्यसनमुक्ती केंद्राजवळ मागून आलेल्या टीव्हीएस दुचाकी चालकाने भरधाव वेगात त्यांना धडक दिली. बाबाराव भगत यांचा हिंगणा ग्रामीण रुग्णालयात नेत असताना रस्त्यातच मृत्यू झाला. बाबाराव यांचा मुलगा राकेश भगत यांनी दिलेल्या तक्रारीवरून हिंगणा दुचाकीचालकाविरुद्ध हिट अँड रनचा गुन्हा दाखल केला.

# भाजपचा बिनविरोध 'फॉर्म्युला' अशक्य

## सुनील केदार यांची स्पष्टोक्ती; विधान परिषद निवडणूक लढवण्याचा काँग्रेसचा निर्धार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपकडून बिनविरोध निवडीचे प्रयत्न सुरू असतानाच काँग्रेसने निवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. माजी मंत्री सुनील केदार यांनी भाजपचा बिनविरोध फॉर्म्युला नागपुरात चालणार नाही, असे स्पष्ट करीत पक्ष कार्यकर्त्यांना सज्ज राहण्याचे आवाहन केले.

नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेसच्यावतीने ग्रामीण भागातील नगरसेवक व नगराध्यक्षांची बैठक जिल्हाध्यक्ष अश्विन बैस यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा काँग्रेस कार्यालयात बुधवारी पार पडली. या बैठकीत आगामी विधान परिषद निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा करण्यात आली.

काँग्रेस ही निवडणूक पूर्ण ताकदीने लढणार आहे. कोणाकडे किती संख्याबळ आहे, हे निकालानंतर स्पष्ट होईल. राज्यातील जनतेमध्ये सत्ताधाऱ्यांविरोधात मोठ्या प्रमाणात नाराजी असून युवकांचा रोष समाज माध्यमावरूनही दिसून येत आहे, असे केदार म्हणाले.

खासदार श्यामकुमार बर्वे यांनी महाविकास आघाडीतील सर्व घटकांनी एकत्रित राहून निवडणूक लढवण्याची गरज व्यक्त केली. माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी काँग्रेसचे सर्व नेते निवडणुकीत उतरायला तयार असल्याचे सांगितले. भाजपला ही निवडणूक बिनविरोध होईल, असा विश्वास वाटत असला तरी काँग्रेस यापूर्वीही निवडणुका लढली आहे आणि यावेळीही पूर्ण ताकदीने मैदानात उतरणार आहे. मित्रपक्षांनाही सोबत घेऊन लढा दिला जाईल, असे जिल्हाध्यक्ष बैस यांनी सांगितले.

बैठकीला प्रदेश सरचिटणीस कुंदा राऊत, किशोर कान्हेरे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ता कोक्कडे, अवंतिका लेकुरवाळे, याज्ञवल्क्य जिचकार, प्रकाश वसु, शकूर नागणी, रमण चौधरी, गंगाधर रेवतकर, नरेश बर्वे यांच्यासह नगराध्यक्ष, नगरसेवक, गटनेते आणि काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

# 'यूपीएससी'कडून नागरी सेवा पूर्वपरीक्षेची उत्तरतालिका जाहीर

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** केंद्रीय लोकसेवा आयोगाने २४ मे रोजी पार पडलेल्या 'नागरी सेवा पूर्वपरीक्षा २०२६'ची अधिकृत उत्तरतालिका जाहीर केली आहे.

आयोगाने घेतलेल्या नवीन धोरणात्मक निर्णयानुसार, परीक्षा संपल्यानंतर अवघ्या तीन दिवसात ही उत्तरतालिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. परीक्षा दिलेल्या उमेदवारांना 'सामान्य अध्ययन पेपर १' आणि 'सामान्य अध्ययन पेपर २' (सीसॅट) या दोन्ही पेपरची उत्तरतालिका यूपीएससीच्या अधिकृत संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येणार आहेत.

नागरी सेवा पूर्व परीक्षा देशभरातील २०७२ परीक्षा केंद्रांवर घेण्यात आली. परीक्षेसाठी अर्ज केलेल्या ८ लाख ९ हजार ७३२ उमेदवारांपैकी सुमारे ५.४९ लाख उमेदवार, म्हणजेच जवळपास ६७ टक्के उमेदवार प्रत्यक्ष उपस्थित राहिले. यंदा आयोगाने बनावट उमेदवारीला आळा घालण्यासाठी आणि परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता अधिक वाढवण्यासाठी प्रथमच परीक्षा केंद्रांवर उमेदवारांचे प्रत्यक्ष चेहरा प्रमाणीकरण सुरू केले. इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या राष्ट्रीय ई-शासन विभागामार्फत (एनइजीडी) स्वदेशी पद्धतीने विकसित करण्यात आलेली ही प्रणाली सर्व परीक्षा केंद्रांवर अवलंबवण्यात आली. तसचे, नागरी सेवा पूर्व परीक्षा घेतल्यानंतर तात्पुरती उत्तरतालिका अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासही सुरुवात करण्यात आली. त्यानुसार बुधवारी उत्तरतालिका जाहीर करण्यात आल्याने उमेदवारांना आपला निकाल पाहता येणार आहे. यामुळे त्यांना मुख्य परीक्षेची तयारी करण्यासही मदत होणार आहे.

# अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाला ३ जूनपासून सुरुवात

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या पदवी स्तरावरील अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षातील प्रवेशाबाबत वेळापत्रक घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार संलग्नित महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रिया राबवावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात आले. ३ जूनपासून या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.

बारावी परीक्षेचा निकाल २ मे रोजी जाहीर झाला. त्यानंतर लगेच पदवी प्रथम वर्ष प्रवेशाला सुरुवात होते. यासाठी विद्यापीठाकडून एक सामाईक वेळापत्रक तयार करून दिले जाते.

यामुळे सर्व महाविद्यालयांमधील प्रवेश प्रक्रिया एकाच वेळी सुरू असते. परंतु, विद्यापीठाकडून यंदा

- माहिती व प्रवेश पुस्तिका वाटप- ३ जूनपासून
- प्रवेश अर्ज भरण्याची मुदत- ३ ते २० जूनपर्यंत.
- गुणवत्ता व प्रतीक्षा यादी- २२ जूनला प्रसिद्ध.
- प्रवेशाची मुदत - २३ जून ते ४ जुलै.
- प्रतीक्षा यादीतील प्रवेश- ५ ते ८ जुलै.
- प्रवेश प्रक्रियेची अंतिम तारीख - ३ ऑगस्ट.

वेळापत्रक विलंबाने देण्यात आले आहे. पदवी स्तरावरील अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सर्व महाविद्यालयांनी शैक्षणिक सत्र २०२६-२७ मध्ये प्रथम वर्षाकरिता प्रवेश प्रक्रिया विद्यापीठाने दिलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण कराव्या, अशा सूचना विद्यापीठाने दिल्या.

महाविद्यालयांना माहिती व प्रवेश पुस्तिका ३ जूनपासून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देता येणार आहे. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज भरण्याची मुदत ३ ते २० जूनपर्यंत राहणार आहे.

गुणवत्ता व प्रतीक्षा यादी २२ जून रोजी प्रसिद्ध करावयाची आहे. २३ जून ते ४ जुलै दरम्यान प्रवेश प्रक्रिया राबवायची आहे. प्रतीक्षा यादीतील प्रवेश प्रक्रिया ५ ते ८ जुलै दरम्यान राबवायची आहे.

आवश्यकता असल्यास समुपदेशन आणि स्पॉट अॅडमिशन प्रक्रिया महाविद्यालयांना राबवता येईल. विद्यापीठाने घोषित केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रिया राबवण्याची अंतिम तारीख ३ ऑगस्टपर्यंत राहणार असल्याचे विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. राजू हिवसे व महाविद्यालयीन विकास विभाग उपकुलसचिव डॉ. राजेंद्र उतखेडे यांनी कळवले आहे.

# विद्यापीठात ईआरपी, एसएपी पदवी अभ्यासक्रम सुरू

## विदर्भातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर करिअरची संधी

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने भविष्याभिमुख शिक्षणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत चार वर्षांचा बी.एस्सी. ईआरपी आणि एसएपी हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमासोबत एक वर्षाची एकात्मिक आंतरवासिता देखील देण्यात येणार आहे. विदर्भातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान आणि डिजिटल व्यवसाय व्यवस्थापन क्षेत्रात करिअर करण्याची संधी मिळणार आहे.

### आधुनिक अर्थव्यवस्थेत महत्त्व

ईआरपी प्रणाली आधुनिक उद्योगांचे मुख्य आधारस्तंभ आहेत. त्या उद्योगांना कार्यक्षमता वाढवणे, खर्च कमी करणे आणि माहिती-आधारित निर्णय घेणे यासाठी मदत करतात. एसएपी प्रणाली सध्या खालील क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. उत्पादन उद्योग, बँकिंग आणि वित्त, रिटेल आणि ई-कॉमर्स, सप्लाय चेन आणि लॉजिस्टिक्स, आरोग्य सेवा, माहिती तंत्रज्ञान, ऊर्जा आणि पायाभूत सुविधा हे अभ्यासक्रमाचे महत्त्वाचे पैलू आहेत.

जगभरातील उद्योग डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहेत. त्यामुळे ईआरपी (उद्यम संसाधन नियोजन) आणि एसएपी (प्रणाली, अनुप्रयोग आणि उत्पादने) मध्ये प्रशिक्षित व्यावसायिकांची मागणी प्रमाणात वाढत आहे. विद्यापीठाचे हे नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक गुणवत्ता आणि प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव यांचा समन्वय साधणार आहे. जागतिक उद्योगांच्या गरजांना उच्च शिक्षणाशी जोडण्याच्या विद्यापीठाचा दृष्टिकोन नवीन पदवी अभ्यासक्रमातून दिसून येतो. आधुनिक व्यवसाय आता केवळ पारंपरिक व्यवस्थापन प्रणालींवर आधारित नसून वित्त, पुरवठा साखळी, उत्पादन, विक्री, लॉजिस्टिक्स आणि मानव संसाधन यांना एकत्र जोडणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अवलंबून आहे.

# २८ जूनला ३५ केंद्रांवर 'टीईटी' परीक्षा

## १६ हजार १०७ उमेदवार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वेळापत्रकानुसार महाटीईटी परीक्षा २८ जूनला होणार आहे. पूर्वी ही परीक्षा २१ जूनला होणार होती. 'नीट' परीक्षेमुळे आठवडाभराने ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली. शहरात यासाठी ३५ केंद्र राहणार असून १६ हजार १०७ उमेदवार परीक्षा देतील, अशी माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी नीलेश गुंड यांनी दिली आहे.

ही परीक्षा दोन टप्प्यांत होईल. पहिला पेपर हा इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या प्राथमिक शिक्षकांसाठी होईल. सहा हजार ६८ उमेदवार ही परीक्षा देतील, तर दुसरा पेपर इयत्ता सहावी ते आठवीपर्यंतच्या उच्च प्राथमिक शिक्षकांसाठी असेल. १० हजार ३९ उमेदवार या परीक्षेला बसणार आहेत.

दोन्ही पेपर प्रत्येकी १५० गुणांचे असून प्रत्येकासाठी अडीच तासांचा वेळ असणार आहे.

परीक्षा सुरळीत होण्यासाठी विविध अधिकाऱ्यांची पथके तयार करण्यात आली आहेत. आता वर्षातून दोनदा ही परीक्षा देण्याची सोय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने उपलब्ध करून दिली आहे.

# युगांडाहून आलेला व्यक्ती गृह विलगीकरणात

## इबोलाची खबरदारी

**नागपूर :** आफ्रिकेतील इबोला उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर युगांडाहून नागपूर विमानतळावर आलेल्या ४७ वर्षीय व्यक्तीला २१ दिवस गृह विलगीकरणात राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कालावधीत संबंधित व्यक्तीला कोणत्याही गर्दीच्या ठिकाणी, सार्वजनिक कार्यक्रमात किंवा सामाजिक समारंभात सहभागी होता येणार नाही.

नागपूर महापालिकेच्या आरोग्य विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित व्यक्तीवर



विशेष देखरेख ठेवली आहे. सध्या त्याच्यामध्ये इबोला संसर्गाची कोणतीही लक्षणे आढळलेली नसली तरी दररोज आरोग्य तपासणी केली जात आहे. पुढील २१ दिवसांत ताप, अशक्तपणा, उलट्या, जुलाब किंवा इतर संशयास्पद लक्षणे दिसल्यास त्याला तातडीने शासकीय वैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात येणार आहे.

दरम्यान, आफ्रिकेतील डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदानमध्ये इबोलाचा उद्रेक झाल्यानंतर केंद्र सरकारने सर्व राज्यांना सतर्कतेचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार विमानतळांवरून येणाऱ्या प्रवाशांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. तसेच जिल्हास्तरावरील 'रॅपिड रिस्पॉन्स टीम' आणि विलगीकरण कक्षही तयार ठेवण्यात आले आहेत. दरम्यान, हा व्यक्ती इबोला रुग्णाच्या संपर्कात आला नसल्याचे महापालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी सांगितले.

# ऑटोचालकाच्या चिमुकलीला मुख्यमंत्री सहायता निधीमुळे जीवदान

## हृदयात छिद्र, तीन दिवसांच्या बालिकेवर मोफत उपचार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** अमरावतीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील अवघ्या तीन दिवसांच्या नवजात बालिकेच्या हृदयात छिद्र असल्याचे निदान झाल्यानंतर मुख्यमंत्री सहायता निधी जिल्हा कक्षाच्या तत्पर हस्तक्षेपामुळे तिच्यावर वेळेत उपचार सुरू करण्यात आले. उपचार, दाखल प्रक्रिया आणि ऑक्सिजनयुक्त रुग्णवाहिकेची मोफत व्यवस्था करण्यात आल्याने कुटुंबाला दिलासा मिळाला आहे.

अचलपूरचे मूळ रहिवासी असलेले हे कुटुंब उदरनिर्वाहासाठी अमरावतीत वास्तव्यास असून कुटुंबातील कर्ते पुरुष भाड्याची ऑटोरिक्षा चालवतात. मुलीच्या जन्मानंतर लगेचच तिच्या हृदयाशी संबंधित गंभीर आजाराचे निदान झाले. प्रकृती चिंताजनक असल्याने बालिकेला अमरावतीहून नागपूर येथील नेल्सन रुग्णालयात हलविण्यात आले. त्यावेळी बालिका ऑक्सिजन सहाय्यावर होती. मात्र आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने ऑक्सिजनयुक्त रुग्णवाहिकेचा खर्च परवडत नव्हता. त्यातच शस्त्रक्रिया तीन महिन्यांनंतरच होऊ शकणार असल्याचे सांगण्यात आल्याने कुटुंबासमोर मोठे संकट उभे राहिले होते.

या प्रकरणाची माहिती मुख्यमंत्री




सहायता निधी कक्ष, अमरावतीचे डॉ. श्याम गावंडे यांनी विदर्भ व नागपूर विभागाचे सदस्य सचिव तथा प्रभारी अधिकारी डॉ. सागर पांडे यांना दिली. त्यानंतर डॉ. पांडे यांनी तातडीने रुग्णालय प्रशासनाशी समन्वय साधत बालिकेला रात्रभर उपचारासाठी दाखल ठेवण्याची व्यवस्था केली. तसेच पुढील उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ऑक्सिजनयुक्त रुग्णवाहिकेद्वारे सुरक्षित हलविण्यात आले. पुढील तीन महिन्यांनंतर आवश्यक असणारी शस्त्रक्रियाही मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. सागर पांडे यांनी दिली. 'मुख्यमंत्र्यांची प्रेरणा डोळ्यांसमोर ठेवून गरजू रुग्णांना मदत करण्याचा प्रयत्न केला जात आहे,' अशी भावना व्यक्त केली. दरम्यान, मुख्यमंत्री सहायता निधी कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांनी या कार्याचे कौतुक करत गरजू नागरिकांनी मदतीसाठी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केले.

MANAPPURAM FINANCE LTD.
CIN : L65910KL1992PLC006623
Registered Office: W - 4/ 638A, Manappuram House, P.O. Valapad, Thrissur - 680 567, Kerala, India

**लिलावाची नोटीस**

विशेषकर गिरवीकर्ताओं और सामान्य रूप में जनता को एतद्द्वारा सूचित किया जाता है कि निम्नलिखित अकाउंट्स में रखे गए सोने के आभूषणों की सार्वजनिक नीलामी निम्नलिखित शाखाओं पर दिनांक 16.06.2026 को सुबह 10.00 बजे से किया जाएगा. हम ऐसे डिफॉल्टर ग्राहकों के सोने के आभूषणों की नीलामी करने जा रहे हैं जिन्होंने रजिस्टर्ड पत्र द्वारा सूचित किए जाने के बावजूद अपने लोन की रकम नहीं चुकाई है. जिन आयटम्स की नीलामी नहीं हो पाएगी, उनकी नीलामी किसी अन्य दिन बिना पुन: सूचना दिए की जाएगी. नीलामी के स्थान व तिथि (अगर कोई हो) में परिवर्तनों की कोई सूचना नीलामी केन्द्र या वेबसाइट पर लगाई जाएगी तथा इस बारे में कोई अन्य सूचना नहीं दी जाएगी.

गिरवियों की सूची :
अकोला, इन्कम टॅक्स चौक, 0110600700022443, 2864, 3067, 3096, जठार पेठ 0111520700035186, 5552, 5792, 6907, 6928, 7033, 7125, 0111520730021403, 2448, 3769, 3770, 3772, श्रीवास्तव चौक अकोला 0134750700020518, 0134750730012086, 4341, विदयानगर अकोला 0110770700027533, 7549, 8375, 9463, 9839, 0110770730020398, 1413, 1721, 1938, 2491, 4203, 4329, 4522, अमरावती, अंजनगांव 0138750730003778, 3830, 3831, 3879, जयस्तंभ चौक 0122460700041926, 2572, 4156, 0122460730019945, 1090, राजपेठ अमरावती 0123250730028921, 1468, 2001, 2148, 2455, 3422, 5870, रवी नगर अमरावती 0115030700045864, 8346, 8542, 0115030730027207, 9682, 9892, वारूद 0139250700004447, 0139250730003566, भंडारा, गाँधी चौक भंडारा 0138990700004527, 0138990730004050, 5325, मेन रोड लकनी 0128980730038426, 8830, मेंन रोड तुमसर 0134710700028844, 9888, 0134710730029640, 9743, जिला परिषद स्क्वायर बांडारा 0132370700022730, बुलढाणा, गाँधी चौक खामगाँव 0134210700026026, 6482, 7112, 0134210730017773, 0369, जलना रोड चिकली 0132350730037379, चंद्रपूर, आंबेडकर चौक वरोडा 0131860700030261, 3196, 3267, 0131860730053289, 6557, 7966, 8681, 0552, बल्लारपूर 0138940700003440, 3999, 0138940730015190, 6812, 6864, 7061, 7067, 7100, भद्रावती 0139050700005077, 5086, 5114, 0139050730028211, 0660, 2532, 3052, कस्तूरबा रोड चंद्रपुर 0138920700002939, 0138920730014309, 4933, 5913, 6052, वर्धा करंजे स्क्वेअर हिंगनघाट 0133230700028895, 9124, 9164, 0133230730037717, आर वि नाका वधा 0134280700027421, 0099, 0344, 0538, 0676, 0799, 0947, 1373, 0134280730043474, वर्धा 0121270700036240, 6470, 6598, 6851, 7293, 7465, 8242, 8375, 8448, 0121270730035181, 5583, 5612, 5668, 5786, 5787, 5795, 5830, 5857, 5970, 6030, 6203, 6429, 6683, 6718, 8316, 8401, यवतमाळ, बस स्टॅन्ड पुसाड 0134620700024443, 5903, 0134620730014095, 4919, 5038, पंढारकावाडा 0134330700051127, 1993, 2448, 2524, 6582, 6805, 7751, 8240, 8339, 8396, 9523, 0531, 0577, 0687, 0701, 0722, 0134330730091772, 2419, 3319, 3848, 4296, 5326, 5991, 5999, 6081, 6140, 6245, 6869, 6935, 7137,

ऊपर बताई गई नीलामी में हिस्सा लेने के इच्छुक व्यक्तियों को नीचे दी गई बातों का पालन करना होगा: इच्छुक बोली लगाने वालों को नीलामी के दिन ही एनईएफटी/आरटीजीएस के ज़रिए 10,000/- रुपये ईएमडी (जो बोली हारने वालों को वापस कर दिया जाएगा) जमा करना होगा। बोली लगाने वालों के पास वैध आईडी कार्ड/पैन कार्ड होना चाहिए। ज़्यादा जानकारी के लिए कृपया 9072607147 पर संपर्क करें।

अधिकृत अधिकारी
मणप्पुरम फायनेंस लि. हेतु.




| एकूण प्रीमियम | | करोत्तर नफा | | पतदारी | | निव्वळ संपत्ती | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 31.03.2026 | 31.03.2025 | 31.03.2026 | 31.03.2025 | 31.03.2026 | 31.03.2025 | 31.03.2026 | 31.03.2025 |
| 44,007 (₹ कोटींमध्ये) | 41,154 (₹ कोटींमध्ये) | 8,392 (₹ कोटींमध्ये) | 6,701 (₹ कोटींमध्ये) | 4.21 | 3.70 | 51,301 (₹ कोटींमध्ये) | 43,107 (₹ कोटींमध्ये) |

**31 मार्च 2026 रोजी संपलेली तिमाही आणि वर्षासाठीचे वित्तीय निष्कर्ष**

रक्कम ₹ कोटींमध्ये

| अनु. क्र. | तपशील | स्टँडअलोन | | | कॉन्सॉलिडेटेड | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेली तिमाही (तीन महिने) | वर्ष ते तारीख आकडेवारी (तीन महिने) | मागील वर्षातील संपलेले संबंधित तीन महिने | संपलेली तिमाही (तीन महिने) | वर्ष ते तारीख आकडेवारी (तीन महिने) | मागील वर्षातील संपलेले संबंधित तीन महिने |
| | | (31/03/2026) | (31/03/2026) | (31/03/2025) | (31/03/2026) | (31/03/2026) | (31/03/2025) |
| | | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| 1 | परिचालनातील एकूण उत्पन्न$ | 11,030 | 44,007 | 10,367 | 11,161 | 44,368 | 10,746 |
| 2 | कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि /किंवा अनन्यसाधारण बाबींच्या आधी#) | 2,960 | 10,793 | 2,923 | 3,108 | 11,447 | 3,144 |
| 3 | कालावधीसाठी कर-पूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि /किंवा अनन्यसाधारण बाबींच्या नंतर#) | 2,960 | 10,793 | 2,923 | 3,108 | 11,447 | 3,144 |
| 4 | कालावधीसाठी कर-पश्चात निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि /किंवा अनन्यसाधारण बाबींच्या नंतर#) | 2,254 | 8,392 | 2,183 | 2,533 | 9,662 | 2,499 |
| 5 | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [ज्यात कालावधीसाठी नफा / (तोटा) (करपश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) ह्यांचा समावेश आहे] | 2,254 | 8,392 | 2,183 | 2,533 | 9,662 | 2,499 |
| 6 | सम भाग भांडवल | 877 | 877 | 877 | 877 | 877 | 877 |
| 7 | मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दाखवलेला राखीवनिधी (पुनर्मूल्यांकन राखीवनिधी वगळता) | 52,861 | 52,861 | 43,927 | 58,419 | 58,419 | 47,782 |
| 8 | प्रति शेअर मिळकत (प्रत्येकी ₹5/-) (सुरू असलेल्या आणि खंडित केलेल्या परिचालनांसाठी) | | | | | | |
| | 1. मूलभूत: | 12.85 | 47.84 | 12.44 | 14.44 | 55.08 | 14.24 |
| | 2. विरलीत: | 12.85 | 47.84 | 12.44 | 14.44 | 55.08 | 14.24 |

टीप
क. वरील उतारा हा सेबी (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, 2015 च्या रेग्युलेशन 33 च्या अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसकडे दाखल केलेल्या तिमाही आणि आज रोजीचे वर्ष ह्यांच्या वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार स्वरूपाचा आहे. तिमाही आणि आज रोजीचे वर्ष वर्ष ह्यांचे संपूर्ण स्वरूपातील वित्तीय निष्कर्ष लेखापरीक्षकाच्या अहवालासह, (www.bseindia.com) आणि (www.nseindia.com) ह्या स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि (https://www.gicre.in/images/2026/Outcome_of_Board_Meeting_final_signed_26th_May_2026.pdf) ह्या कॉर्पोरेशनच्या वेबसाइटवर पोस्ट केले आहेत आणि क्यूआर कोड स्कॅन करून ते बघता येतील.
ख. $परिचालनातून मिळणारे एकूण उत्पन्न म्हणजे एकूण लिखित प्रीमियम, पुनर्विम्याची एकूण रक्कम आणि निव्वळ लागू कर.

स्थळ: मुंबई
तारीख: 26/05/2026

जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियासाठी आणि वतीने
हितेश जोशी
ईडी (ॲडिशनल चार्ज ऑफ सीएमडी)
DIN: 09322218

वर प्रदर्शित करण्यात आलेला जीआयसी री ट्रेड लोगो हा जीआयसी री यांच्या मालकीचा आहे आणि जीआयसी री द्वारा त्याचा परवान्यांतर्गत उपयोग करण्यात येत आहे. 'सुरक्षा', 170, जमशेदजी टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई 400 020, भारत. दूरध्वनी (बोर्ड):+91 22 2286 7000
सीआयएन क्र.: L67200MH1972GOI016133,
आयआरडीएआय नोंदणी क्र. 112, वेबसाईट: www.gicre.in

**भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ**
'सुरक्षा', 170, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई 400020, भारत | टेलिफोन (बोर्ड): +91 022 2286 7000 • ईमेल: investors.gic@gicre.in
आयआरडीएआय नोंदणी क्रमांक: 112 सीआयएन: L67200MH1972GOI016133 www.gicre.in